



दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १७५ ●बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955





**नवरात्र उत्सव**

तीसरी माळ



*तृतीयेचे दिवशी अंबे*
*शृंगार मांडीला हो*
*मळवट पातळ चोळी*
*कंठी हार मुक्ताफळा हो*
*कणकेचे पदके कासे*
*पितांबर पिवळा हो*
*अष्टभुजा मिरविसी अंबे*
*सुंदर दिसे लीला हो*
*॥३॥*

# शेतीचं नुकसान आणि जनावरांचा मृत्यू, सरकार शेतकऱ्याला किती रुपये मदत देणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याला मुसळधार पावसाने झोडपून काढलं आहे. या पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. शेती आणि घरांचे नुकसान झाले तर अनेक ठिकाणी काही नागरिक आणि जनावरं यांचा देखील मृत्यू झाला आहे. सरकारने तातडीने मदत करावी आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी म ागणी शेतकरी करत आहेत.

अशातच पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण सरकार दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देणार असल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यात झालेल्या नुकसानीवर चर्चा झाली. या बैठकीनंतर कृषीमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी असून दिवाळीपूर्वी त्यांना भरपाई दिली जाईल असे त्यांनी सांगितले.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, ' अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना भरपाई सरकार भरपाई देणार आहे.




**●घरांची पडझड, शेतीचे नुकसान आणि जनावरांचा मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांना मदत दिली जाणार**

दिवाळीआधी नुकसानग्रस्तांना भरपाई दिली जाईल. दिवाळीपूर्वी सर्वांना नुकसान भरपाई मिळेल. राज्याला अतिवृष्टीचा फटका बसत आहे. अतिवृष्टीमुळे शेती आणि पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे. शेतकऱ्यांसाठी योग्य आणि चांगला निर्णय सरकार घेईल. नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. ' अतिवृष्टीमुळे राज्यातील एकूण ३० जिल्हे बाधित झाले आहेत. १९५ तालुक्यांना मुसळधार पाऊस आणि पुराचा फटका बसला आहे. तर ६५४ म हसूल मंडळांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. राज्यातील खरीप

▶▶ उर्वरित पान २ वर



*शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते मा. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी आज बीड जिल्ह्यातील चौसाळा या ठिकाणी अतीवृष्टी झालेल्या भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधून धीर दिला. शेतकऱ्यांना सरसकट व तात्काळ मदत मि ळावी यासाठी शासन दरबारी मागणी करणार असल्याचे सांगितले. यावेळी जेष्ठ शिवसैनिक विलास महाराज शिंदे, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर, महिला आघाडी च्या मीराताई नवले, नितीन धांडे, उपजिल्हा प्रमुख भाई संजय महाद्वार, राजाभाऊ माहुवाले, सुशील पिंगळे तालुका प्रमुख गोरक्ष शिंगण, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, रवी वाघमारे सह शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.*

## खा.बजरंग सोनवणे पुरग्रस्तांच्या भेटीला

**मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द**

**● शेतकऱ्यांचे पुसले आश्रू, केज, अंबाजोगाई तालुक्यात दिल्या भेटी**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. मंगळवारी पहाटे जिल्ह्यातील ५७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून खा.बजरंग सोनवणे मागील आठ दिवसांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीची पाहणी करून दिल्लीला गेले होते. यानंतर मागे पुन्हा अतिवृष्टी झाल्याने ते तातडीने मंगळवारी सकाळी बीडला रवाना झाले. यानंतर दुपारी त्यांनी धानोरा, देवळा

▶▶ उर्वरित पान २ वर



**● आज पाटोदा, शिरूर बीड दौरा**

**खा.बजरंग सोनवणे हे आज पाटोदा, शिरूर आणि बीड तालुक्यातून वाहणाऱ्या मोठ्या नद्यामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करणार आहेत. पाटोदा, शिरूर शहरात पाणी शिरूर त्याठिकाणी व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाले होते. त्याठिकाणी देखील ते भेटी देणार आहेत. तर बीड तालुक्यात सिंदफणामुळे जिथे नुकसान झाले आहेत, अशा ठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.**

## गोदावरीला आलेल्या पुराचा पोहनेरला वेढा ; धनंजय मुंडेंनी होडीतून जात ग्रामस्थांना दिला धीर

**सर्व यंत्रणा सज्ज ; कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी तयार राहण्याच्या प्रशासनास सूचना ; पोहनेर भागात धनंजय मुंडे यांनी केली पूर परिस्थितीची पाहणी**

**परळी वै.। प्रतिनिधी**

गोदावरी नदी प्रवाहास प्रचंड पूर आलेला असून, परळी तालुक्यातील पोहनेर गावास पुराचा वेढा पडला आहे, याठिकाणी आज परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी चक्क होडीतून (चप्पू) जात गावातील नागरिकांशी संवाद साधत त्यांना धीर व दिलासा दिला. धनंजय मुंडे यांनी या संपूर्ण भागातील गावांच्या स्थितीचा प्रशासनाकडून आढावा घेत प्रशासनास कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी व सर्व प्रकारच्या यांत्रणांसह सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान अनेक



घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळित होऊन संसारोपयोगी साहित्य, अन्न धान्य आदींचे नुकसान झाले असून, स्थानिक आपत्ती निवारण निधीतून तातडीने आर्थिक मदत करण्याच्या सूचना श्री मुंडे यांनी महसूल प्रशासनास केल्या आहेत. पोहनेर सहित आजूबाजूच्या बऱ्याच गावांना

▶▶ उर्वरित पान २ वर

## ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या : डॉ ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पावसामुळे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी



अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषी मंत्री यांच्या कडे केली आहे. राज्यात सध्या मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मराठवाड्यासह जळगाव,

▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव धरणाचे 11 दरवाजे उघडले, सिंदफणेच्या पुराचा सांडस चिंचोलीला वेढा



**माजलगाव । प्रतिनिधी**

रविवारी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे माजलगाव धरणात सकाळपासून पाण्याची मोठी आवक वाढल्याने अकरा दरवाजे उघडावे लागले. सिंदफणा नदी पात्रात ८८ हजार क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे मागील आठ दिवसात दुसऱ्यांदा सिंदफणा नदीवरील जुन्या पुलावरून पाणी जाऊ लागले आहे. रविवारी रात्री सुरू झालेला पाऊस सोमवारी सकाळपर्यंत सुरू राहिल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यापूर्वी शेतकऱ्यांची सोयाबीन व इतर पिके हातची गेली होती. आता या पावसामुळे राहिलेल्या पिकांना मोठा फटका बसला. माजलगाव धरणातून सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडल्यामुळे माजलगाव तेलगाव रस्त्यावर सिंदफणा नदीवरील जुन्या पुलावरून पाणी गेले. हे पाणी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. सिंदफणा नदीपात्रात मागील तीन आठवड्यांपासून माजलगाव धरणातून पाणी सोडण्यात येत आहे. गोदावरी व सिंदफणा नदी पात्रात सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे माजलगाव तालुक्यातील सांडस

▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना दिला धीर



**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा म तदारसंघातील हिंगणी खु., चौसाळा, वाढवणा पूल, बोरखेड, शिंदेवस्ती पूल (बोरखेड) आदी गावांमधील पूरग्रस्त भागात मंगळवारी (दि. २३) राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाहणी केली. याच वेळी डॉ.सारिका क्षीरसागर यांनीही बीड व शिरूर कासार तालुक्यातील काही गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. दाम्पत्याने थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांना धीर दिला. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेती उभी करणे कठीण झाले आहे. या नुकसानीची माहिती डॉ. क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना सादर केली आहे. आज (दि.२४) अजितदादा पवार यांचा दौरा होण्याची शक्यता असून ते प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. तातडीने मदत जाहीर करण्यासंदर्भात ते निर्णय घेतील, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांशी बोलताना दिली. त्यांनी पुढे म्हटले की, पूरस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी सरकार हालचाल करत आहे. ऑगस्टमधील नुकसानीसाठी ५६ कोटी रुपयांचे अनुदान जिल्ह्याला मि ळाले आहे. सप्टेंबरमधील पंचनामे पूर्ण होताच मदत दिली जाणार आहे, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले.

**डॉ.सारिका क्षीरसागर यांची बीड, शिरूर कासार तालुक्यातील गावांमध्ये पाहणी**

**डॉ.सारिका क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील राजुरी, बहादरपूर, साक्षाळपिंपरी तसेच शिरूर कासार तालुक्यातील कमलेश्वर धानोरा आदी गावांमध्ये नुकसानग्रस्त शेती, रस्त्यांची पाहणी केली. दरम्यान, आज (दि. २४) त्या गात शिरापूर, हाजीपुर, गाजीपूर, आर्वी, फुलसांगवी व मार्कडवाडी या गावांना भेट देणार आहेत.**

**'कल्पतरू'चा दांडिया कार्यक्रम पुढे ढकलला**

**जिल्ह्यातील सलग पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असल्याने बीड शहरातील 'कल्पतरू' आयोजित 'नवजलसा दांडिया' कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम २५ सप्टेंबर रोजी होणार होता. नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, अशी माहिती सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी दिली.**

## बीडच्या खामगाव आणि नांदूर हवेलीत येथील पुरात अडकलेल्या त्या 32 नागरिकांना सोमवारी रात्री सुखरूप काढले बाहेर



**गेवराई । प्रतिनिधी**

रविवार आणि सोमवारी झालेल्या मुसळधार पावसाने गोदावरी आणि सिंदफणा नदीने उग्र रुप धारण केल्यामुळे परिसरात पूरग्रस्त परिस्थिती गंभीर बनली आहे.बीडमधील हिंगणी हवेली गावाला पूराने वेढले असल्याने अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित याठिकाणी दाखल होताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पूरपरिस्थितीचा फोनवर माहीती दिली. यावर एनडीआरएफ तुकडीच्या मदतीने पुरात अडकलेल्या त्या ३२ नागरिकांना सोमवारी रात्री सुखरूप बाहेर काढण्यात आले. बीडच्या गेवराई विधानसभा मतदारसंघातील खाम गाव

▶▶ उर्वरित पान २ वर

## ऑगस्ट मधील नुकसानीसाठी बीड जिल्ह्यास ५६ कोटी ७३ लाखांची मदत ; एकट्या परळी तालुक्यास ३० कोटी

**आ. धनंजय मुंडे यांनी मानले शासनाचे आभार**

**परळी वै.। प्रतिनिधी**

ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची मदत म्हणून राज्य सरकारने आज १३३९ कोटी रुपयांची मदत वितरीत करण्याचा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या मार्फत निर्गमित केला

▶▶ उर्वरित पान २ वर




# गुलाल कुणाचा ? झेडपी-पंचायत समिती निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर



राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. याअनुसार प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याची कालावधी ८ ते १४ ऑक्टोबर २०२५ असेल.

मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर : राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येईल. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. या यादीवर हरकती व सूचना दाखल केल्यानंतर अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केली जाईल.

हरकती व सूचनांचा वापर : मतदार याद्यांमध्ये विधानसभा मतदार यादीप्रमाणेच नाव व पत्ते कायम ठेवले जातात. नवीन नावांचा समावेश, नावे वगळणे किंवा पत्त्यात दुरुस्ती यासारख्या बदलासाठी केवळ हरकती व सूचनांचा वापर केला जाईल. या प्रक्रियेत मुख्यतः लेखनिकांकडून झालेल्या चुका, प्रभागाच्या यादीत नाव नसणे किंवा निर्वाचक गणनेतील त्रुटी दुरुस्त केल्या जातील.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता: राज्य निवडणूक आयोगाचे हे पाऊल निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि लोकशाहीतर्फे सहभाग सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. मतदार यादीतील हरकती व सूचना दाखल करण्यासाठी नागरिकांनी आपला अधिकार वेळेत वापरण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हा परिषदांमधील अध्यक्षपदाचे आरक्षण :

ठाणे –सर्वसाधारण (महिला)
पालघर – अनुसुसूचित जमाती
रायगड– सर्वसाधारण
रत्नागिरी– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
सिंधुदुर्ग – सर्वसाधारण
नाशिक –सर्वसाधारण
धुळे –नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
नंदूरबार–अनुसूचित जमाती
जळगांव – सर्वसाधारण
अहिल्यानगर अनुसूचित जमाती (महिला)
पुणे –सर्वसाधारण
सातारा– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
सांगली – सर्वसाधारण (महिला)
सोलापूर – नागरिकांचा मागास प्रवर्ग
कोल्हापूर– सर्वसाधारण (महिला)
छत्रपती संभाजीनगर –सर्वसाधारण
जालना – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
बीड – अनुसूचित जाती (महिला)
हिंगोली –अनुसूचित जाती
नांदेड – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
धाराशिव – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
लातूर – सर्वसाधारण (महिला)
अमरावती – सर्वसाधारण (महिला)
अकोला – अनुसूचित जमाती (महिला)
परभणी – अनुसूचित जाती
वाशिम अनुसूचित जमाती (महिला)
बुलढाणा –सर्वसाधारण
यवतमाळ सर्वसाधारण
नागपूर – नागरिकांचा मागास प्रवर्ग
वर्धा– अनुसूचित जाती
भंडारा – नागरिकांचा मागास प्रवर्ग
गोंदिया – सर्वसाधारण (महिला)
चंद्रपूर – अनुसूचित जाती (महिला)
गडचिरोली –सर्वसाधारण (महिला)

# 94 मिनिटांचा थरार! विमानांच्या चाकांमध्ये लपून दिल्लीत आलेल्या अफगाणी मुलासोबत पुढे काय घडलं?

अफगाणिस्तानच्या एका १३ वर्षांच्या मुलाने जीवाशी खेळ करून एक अत्यंत धोकादायक प्रवास केला आहे. हा मुलगा काबुलहून दिल्लीला येणाऱ्या एका विमानाच्या चाकांमध्ये लपून बसला आणि तब्बल ९४ मिनिटांच्या या थरारक प्रवासानंतर तो दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुखरूप पोहोचला.

ही घटना रविवारी अफगाणिस्तानची एअरलाइन 'केएएम एअर'च्या 'आरक्यु४४०१ या विमानामध्ये घडली. मात्र, दिल्लीत उतरताच त्याला पुन्हा त्याच विमानाने परत पाठवण्यात आले.

रविवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास हे विमान दिल्लीत उतरले. सर्व प्रवासी उतरल्यानंतर विमान जेव्हा टॅक्सीवेवर उभे होते, त्याचवेळी तेथे काम करणाऱ्या एका ग्राउंड स्टाफच्या नजरेस विमानाजवळ एक मुलगा फिरताना दिसला. त्याला पाहताच सर्वांना धक्का बसला, कारण एवढा वेळ तो जिवंत कसा राहिला हा प्रश्न सर्वांना पडला. तात्काळ या घटनेची माहिती विमानतळावरील अधिकाऱ्यांना देण्यात आली.

पोलिसांच्या चौकशीत समोर आले की, हा मुलगा अफगाणिस्तानमधील कुंदुज शहराचा रहिवासी आहे. त्याने विमानतळाच्या अधिकाऱ्यांना सांगितले की, तो काबुल विमानतळाच्या आतमध्ये घुसला आणि त्यानंतर विमानांच्या चाकांच्या जागेत लपून बसला. या धोकादायक प्रवासाचे कारण विचारले असता, त्याने फक्त उत्सुकतेपोटी असे केल्याचे सांगितले.

सुरक्षा कर्मचाऱ्यांनी या मुलाला ताब्यात घेतले



आणि त्याला केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या स्वाधीन केले. सीआयएफएसच्या जवानांनी त्याला पुढील चौकशीसाठी टर्मिनल ३मध्ये आणले.

चौकशी पूर्ण झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी तात्काळ निर्णय घेतला. या अफगाणी मुलाला दिल्लीत ठेवण्याऐवजी, त्याला त्याच विमानात बसवून काबुलला परत पाठवण्यात आले. हे विमान दुपारी १२.३० वाजता काबुलसाठी रवाना झाले. केएएम एअरलाइनच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी परत जाण्यापूर्वी लँडिंग गियर कम्पार्टमेंटची तपासणी केली असता त्यांना एक छोटा लाल रंगाचा स्पीकर सापडला, , जो त्या मुलाचा असावा.

विमानांच्या चाकांमध्ये किंवा अंडरकॅरेजच्या आतमध्ये लपून प्रवास करण्याला 'व्हील–वेल स्टोवेज' असे म्हणतात. हा प्रवास अत्यंत धोकादायक मानला जातो, कारण जास्त उंचीवर ऑक्सिजनची कमतरता आणि खूप कमी तापमान असते. अशा प्रवासांमध्ये अनेकदा प्रवाशांचा मृत्यू होतो. यापूर्वीही अशा अनेक घटना घडल्या आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

## शेतीचं नुकसान...

शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहेत. प्राथमिक अंदाजानुसार राज्यात २७,९८,०५४ हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. १० हजार हेक्टरपेक्षआ जास्त बाधित क्षेत्र असलेल्यांमध्ये १५ जिल्हे आहेत. नांदेड, सोलापूर, यवतमाळ, धाराशिव, बीड, अहिल्यानगर, वाशिम, बुलडाणा, जालना, हिंगोली, अकोलायासह ३० जिल्हयांना पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. नुकसान झालेल्या भागातील शेतकऱ्यांना सरकारकडून दिवाळीपूर्वी मदत मिळणार आहे.

नुकसानग्रस्ताना किती रुपये आणि कशी मदत मिळणार ?

– कोरडवाहू पिके प्रति हेक्टर – १८५०० रुपये
– बागायती पिके – १७००० रुपये (प्रति हेक्टर)
– बहुवार्षिक पिके – २२५०० रुपये (प्रति हेक्टर)
– खरडून गेलेल्या जमिनीसाठी (दुरूस्ती होऊ शकणारे) – १८००० रुपये (प्रति हेक्टर)
– खरडून गेलेल्या जमिनीसाठी (दुरूस्ती न होणारे) – कमीत कमी ५००० रुपये आणि जास्तीत जास्त ४७००० रुपये (प्रति हेक्टर)
– वरील मदत एका शेतकऱ्याला दोन हेक्टरच्या मर्यादेत दिली जाईल.
– रेशीम उत्पादन नुकसान झाल्यास एटी, मलबेरी टसर ६००० रुपये तर मुगा रेशीमसाठी ७५०० रुपये

ऊहरीरीहळीं ऋश्रेवी: घरात चिखल, मुलांची वह्या–पुस्तके पाण्यात, आईच्या अश्रूचा बांध फुटला, काळजाला धस्स करणारा व्हिडिओ

– दुधाळ जनावरे दगावल्यास ०३७,५०० रुपये
– ओढ काम करणारे जनावरे दगावल्यास ३२००० रुपये
– लहान जनावरे २०००० रुपये मदत
– शेळी, मेंढी, बकरे, डुक्कर– ४००० रुपये
– मोठी जनावरे मर्यादा – ३
– छोटी जनावरे मर्यादा – ३०
– कुकूटपाल – प्रति कोंबडी १०० (प्रति कुटुंब १०००० रुपये)
– घरे पडझड ८००० रुपये (प्रति झोपडी)
– पूर्ण घर पडझड पक्की घरे – १,२०,००० रुपये

◆ पान १ वरून पुढे...

– गोठा ३००० रुपये (प्रति गोठा)

## खा.बजरंग...

(ता.अंबाजोगाई) आणि इस्थळ (ता.केज) येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून अतिवृष्टी होत आहे. पहिल्यांदा अतिवृष्टी झाली तेव्हा तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी बांधावर जावून पिकाची पाहणी केली होती. यानंतर काही दिवसाने पाऊस थांबला होता. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे दिल्ली येथे जिल्ह्याच्या विकास कामाच्या निमीत्ताने गेले होते. यानंतर बीड जिल्ह्यात पावसाने सुरूवात केली. सलग तीन दिवसांपूसन बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे नद्याना महापूर आलेला आहे. या पुरात शेती आणि पिकेही वाहून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पशुधनही वाहून गेले असून कोट्यावधी रूपयांचे नुकसान झालेले आहे. मागील काही दिवसांपासून शेतात पाणी असल्याने पिके पिवळी पडत आहेत. शिवाय पुरामुळे शेती खरडून गेली असून आता पुन्हा शेतकऱ्यांनी शेती करायची कशी असा प्रश्न आहे. मंगळवारी खा.बजरंग सोनवणे हे दिल्लीवरून शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी परतले. यानंतर त्यांनी केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी, आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. कोणतीही अडचण वाटली तर संपर्क करा, तुम्हाला शासनस्तरावर मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, वेळप्रसंगी शासनाला भांडू परंतु मदत मिळवून देऊ, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

## गोदावरीला आलेल्या...

पाण्याचा वेढा पडलेला असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत काळजी घेण्याचे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे. कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रशासनाशी किंवा आपल्या कार्यालयाशी संपर्क साधावा असेही आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे. दरम्यान राज्य सरकार या भीषण परिस्थिती मध्ये शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील व १००% नुकसानीची भरपाई दिली जाईल, अशी अपेक्षा देखील धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली

◆ पान १ वरून पुढे...

आहे. यावेळी ॲड गोविंदराव फड, राजाभाऊ पौळ, लक्ष्मणराव पौळ, प्रभाकर पौळ, विशाल श्रीरंग पाटील, चंद्रकांत कराड, माऊली तात्या गडदे, बाबासाहेब काळे, नितीन निर्मळ, राम किरवले यांसह ग्रामस्थ तसेच तहसीलदार व्यंकटेश मुंडे, सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांसह महसूल, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस आदी विभागाचे अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

## ओला दुष्काळ...

अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव, बीड या जिल्ह्यांत अतिवृष्टीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. बीड जिल्ह्यात पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसाने कहर केला तर पुढील संपूर्ण आठवडा पावसाचा असणार आहे. तसेच, शुक्रवारनंतर पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. या मुसळधार पावसाने मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचं नुकसान झालं आहे. दरम्यान, आधी अवकाळी आणि आता अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पावसामुळे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने शेतकऱ्यानं मदत करावी.

## माजलगाव धरणाचे...

चिंचोलीला या पाण्यामुळे सकाळी दहा वाजल्यापासून वेढा पडला आहे. यामुळे या गावातील नागरिकांचा संपर्क तुटला आहे.

## बीडच्या खामगाव...

आणि नांदूर हवेली या गावाला सिंदफणा नदीच्या पाण्याने वेढल्याने ३२ नागरिक पुरात अडकले होते. याची माहीती होताच गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित तहसीलदार चंद्रकांत शेळके हे पुरग्रस्त भागात दुपारी चार वाजता पोहचले. पुरात अडकलेल्या अनेक लोकांची प्रशासनाच्या मदतीने सुटका करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. एवढेच नाहीतर आमदार पंडित यांनी परिस्थिती गंभीर असल्याची माहीती फोनवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देत नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यास प्रशासकीय मदत पाठविण्याची विनंती केली. यावरुन हेलीकॉप्टर पाठवण्याचे देखील

◆ पान १ वरून पुढे...

उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले. मात्र, वातावरण दूषित असल्याने हेलीकॉप्टर आले नसल्याने एनडीआरएफ तुकडीच्या मदतीने सोमवारी रात्री नांदूर हवेलीत अडकलेल्या त्या ३२ नागरिकाला सुखरूप बाहेर काढण्यात आले असल्याची माहीती प्रशासनाने दिली.

धिर सोडू नका पुरग्रस्ताच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहणार–

नांदूर हवेलीतील त्या अडकलेल्या ३२ नागरिकांना पुरातुन बाहेर काढल्यानंतर गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी घाबरु नका प्रशासन आणि मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून मदतीसाठी शासन दरबारी प्रयत्न करणार आहे.

## ऑगस्ट मधील....

असून, बीड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीच्या मदतीपोटी ५६ कोटी ७३ लाख रुपये मदत मंजूर करण्यात आली आहे. दरम्यान ऑगस्ट महिन्यात बीड जिल्ह्यात परळी तालुक्यात सर्वाधिक १०४ गावांमध्ये पिकांचे ३३% पेक्षा अधिक नुकसान झाले होते. त्यामुळे सुमारे ५४,८९० बाधित शेतकऱ्यांना जिल्ह्यात सर्वाधिक ३० कोटी १६ लाख रुपये मदत एकट्या परळी तालुक्यासाठी मंजूर करण्यात आली असल्याची माहिती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी सोशल मीडिया पोस्ट व्दारे सांगितली आहे. ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी संपूर्ण स्थानिक प्रशासन व सर्व गट – गण प्रमुख यांची एकत्रित बैठक घेऊन गावनिहाय नुकसानीचा आढावा घेऊन त्यानुसार पंचनम्याचे अहवाल शासनास सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सादर अहवालानुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे. दरम्यान या मदतीचे तातडीने सबंधित शेतकऱ्यांना वितरण करण्यात येणार असून, धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या सह राज्य शासनाचे यासाठी आभार व्यक्त केले आहेत. तसेच सध्या सप्टेंबर महिन्यात सुरू असलेली परिस्थिती अत्यंत विदारक असून, शेती पिके, कुटुंबे, घरे, गावे यांची प्रचंड वाताहत झाली आहे ; राज्य सरकारच्या वतीने या संपूर्ण परिस्थितीची दखल घेतली जाईल व १००% नुकसान भरपाई दिली जाईल, असा विश्वासही श्री. मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## ओला दुष्काळ...

अधिकारी जायभाये,तलाठी पोतदार,कृषी सहाय्यक आनंद वाघ, नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, बाबासाहेब ढाकणे आदींना निवेदन दिले.यावेळी आंदोलनात राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी,सरपंच बालासाहेब जाधव, दामोदर थोरात, सुरेश निर्मळ,श्रीहरी निर्मळ, ,अँड. गणेश वाणी, बाळासाहेब मुळे, पांडुरंग वाणी, संजय घोलप, शंकर वाणी, श्रीहरी कोटुळे,खंडू वाणी, भगवान मोरे आदी ग्रामस्थ सहभागी होते. डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले की, आता कसला पंचनामा आणि कसली नोंद? शेतकऱ्यांचं सगळंच वाहून गेलं आहे. प्रशासनाने औपचारिकता न करता तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई व कर्जमाफी करावी. अन्यथा शेतकरी आत्महत्यांकडे ढकलले जातील.

## शेतकऱ्यांना तत्काळ...

अशी तीव्र मागणी ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शासनाकडे केली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव उपजिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी हजारो शेतकरी उपस्थित होते, तर याच सर्व मागण्या आणि इतर अनेक मागण्या घेऊन जिल्हाधिकारी यांच्या दालनात अनौपचारिक बैठक संपन्न झाली. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी उपस्थित होते. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक गावांत जाऊन जलनायक मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यांच्या अडचणी आणि व्यथा समजून घेतल्या. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संपूर्णतः खचले आहेत. कोणाचे पिके गेली, गुरे – जनावरे गेली, शेतातील साहित्य वाहून गेले तर कोणाची राहती घरे पडली आहेत. या संपूर्ण नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व तत्काळ मदत जाहीर करावी. पाण्याने वाहून गेलेल्या जमिनीला आर्थिक मदत दिल्यानंतर त्या जमिनीची पोटखराब क्षेत्र म्हणून ७/१२ वर नोंद घेऊन नये तसेच संपूर्ण मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी आग्रही मागणी जलनायक मयंक गांधी यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शेकडो शेतकऱ्यांना घेऊन

◆ पान ४ वरून पुढे...

अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात आले तर जिल्हाधिकारी बीड यांच्या दालनात अप्पर जिल्हाधिकारी आणि निवासी जिल्हाधिकारी यांच्या समवेत अनौपचारिक बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न मंडण्यात आले. झालेल्या बैठकीनंतर शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल तसेच शासनाला झालेल्या नुकसानीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल देण्यात येईल असे आश्वासन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहे. ऐन सणासुदीच्या काळात अतिवृष्टी झाली आणि सर्वच आनंदावर विरजण पडले. शेतातील उभे पिक तर पाण्याने गेलेच, मात्र सुपीक मातीही वाहून गेल्याने जमीनच राहिली नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने ही बाब गांभीर्याने घेऊन दसरा आणि दिवाळी पूर्वी भरीव आर्थिक मदत तत्काळ द्यावी यासंदर्भात उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मागणी करणार असल्याचे मयंक गांधी यांनी म्हटले आहे.

## मराठवाड्याला नैसर्गिक..

शेतजमिनी, उभे पिक, घरे, जनावरे यांचे मोठे नुकसान झाले आहे. बळीराजा आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाला आहे. या परिस्थितीत तातडीने मदतीची गरज आहे. तसेच राज्य शासनाने आठ दिवसांच्या आत या मागण्यांवर ठोस निर्णय न घेतल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.सद्यस्थितीत मराठवाड्यातील अनेक तालुक्यांत अवकाळी व सततच्या पावसामुळे शेतीचाच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही मोठा फटका बसत आहे. त्यामुळे राज्य शासन या मागणीकडे गांभीर्याने पाहेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## तुळजापूर ते...

नवरात्रोत्सवाच्या शुभारंभी गावकर्यांनी ऐक्य, भक्ती आणि परंपरेचे दर्शन घडवले. गावकर्यांच्या म्हणण्यानुसार, ही ज्योत पायी आणणे म्हणजे फक्त श्रद्धेचा भाग नसून गावाच्या परंपरेशी निगडित अभिमानाचा विषय आहे. पुढील पिढ्यांनी ही परंपरा कायम ठेवावी, अशी वाघेश्वरी तरुण मित्र मंडळ सर्व ग्रामस्थांची इच्छा आहे. गट स्थापनेनंतर गावकर्यांनी एकत्र येऊन वाघेश्वरी मातेस वंदन केले आणि नवरात्रोत्सवाच्या सुरुवातीस संपूर्ण गावात

◆ पान ४ वरून पुढे...

आनंदाचे वातावरण पसरले.

## ना. पंकजाताई मुंडे...

सिंदफणा काठावर असलेल्या गावांना बसला असून, उभ्या पिंकाचे नुकसान झाले आहे. शेती पिकांसह खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी ढासळून बुजून गेल्या आहेत. कापूस पिकाला फटका बसला आहे.मंगळवार ता. २३ रोजी बाळराजे पवार यांनी सिंदफणा गाठच्या गावांना भेटी देऊन, नुकसानग्रस्त भागाची पाहाणी करून ; नागरीकांशी संवाद साधला. सिरसमार्ग, धारवंटा, उक्कडपिंप्री, साक्षाळपिंप्री गावातील शेतीचे प्रचंड नुकसान झालेले असल्याने, या भागातील शेतकर्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. सिंदफणा काठावरच्या गावांचे झालेले नुकसान पाहता असताना, युवा नेते बाळासाहेब सानप यांनी थेट पंकजाताई मुंडे यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संपर्क केला. यावेळी , बाळराजे पवार यांनी ना. मुंडे यांच्याशी सविस्तर चर्चा करून, उद्भवलेल्या परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. सिंदफणा आणि गोदाकाठच्या गावांच्या बाधित झालेल्या क्षेत्राचा सविस्तर अहवाल द्या, अशी सूचना ना. मुंडे यांनी बाळराजे पवार यांना केली आहे. दरम्यान, गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी खचल्या आहेत. त्याच बरोबर, नागरिकांच्या घरात पाणी जाऊन, संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी आग्रहाची बाळराजे पवार यांनी केली आहे यावेळी अनिल पौळ, बाळासाहेब सानप,पवन गावडे,रमेश तळेकर, सचिन वावरे,विष्णुपंत आतकरे, श्रीराम घाटुळ, पत्रकार जुनेद बागवान, सुभाष सुतार, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## गायरान धारकांच्या....

नावे करण्यासाठी गायरान धारकांनी मुळ कागद पत्रांसह आपले प्रस्ताव वेळो–वेळी महसूल विभागाकडे सादर केलेली आहेत. परंतू शासनाच्या गळचेपी धोरणांमुळे गायरान जमिनी नावे होण्यासाठी विलंब होत आहे. अठरापगड जातीच्या समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी काम करणारी चळवळ रिपब्लिकन पक्षाची आहे. आम्ही रिपाइंच्या माध्यमातून आजपर्यंत जिल्ह्यातील गायरान धारकांच्या नावे दोन हजार एकर

◆ पान ४ वरून पुढे...

जमीन करून सातबारा वाटप केले आहेत, व पाच हजार एकर गायरान जमिनीवर नविन अतिक्रमण करण्यात आले आहे. हे रिपाइंच्या आंदोलनाचे मोठे यश आहे. कसत असलेल्या गायरान जमीन व नवीन अतिक्रमणित जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी १९९० च्या शासन जीआर नुसार गायरान धारकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक, शेतमजूर, ऊसतोड कामगार यांना प्रति महिना ३००० रुपये मानधन देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८–अ उतारा क्षेत्रावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.१९९० च्या शासन परिपत्रकास २०१५ पर्यंत मुद्दत वाढ देण्यात यावी. या प्रमुख मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलन करण्यात आले. आगामी काळातही गायरान धारकांना हक्काच्या जमिनी मिळवून देण्यासाठी रिपाइंच्या वतीने राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा करणार आहे. यावेळी राजू जोगदंड, मझर खान, किसन तांगडे, किशोर कांडेकर, सुशिलाताई मोराळे, अशोक साळवे, दिपक कांबळे, महादेव उजगरे, थोडीराम सिरसट, सचिन कागदे, हरिश मस्के मायाताई मिसळे, राणी गायकवाड, सलमा पठाण, शोभा गलांडे, दशरथ सोनवणे, सादेक पठाण,गोवर्धन वाघमारे, बापू पवार, शाहु डोळस, अरुण निकाळजे, लक्ष्मण सिरसट, दशरथ शिदे, महेश आठवले, सादेक कुरेशी, विजय चांदणे, दिलिप बन्सोडे, रविंद्र जोगदंड, गौतम बचुटे, विलास वाघमारे, प्रमोद दासूद, दिपक कांबळे, मिलींद तरकसे, सुरज काळे, निलेश ढोबळे, राहुल सरवदे, भगवान ससाणे, गणेश लांडगे, राहुल वाघमारे,राजकुमार सोनवणे, विजय डावरे, हरीश जावळे, कपिल जावळे, किशोर जावळे, विजय जाधव, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, नागेश दुबळे,भैय्या मस्के, संभाजी गायकवाड, भैय्या साळवे, संजय हनवते, सचिन वडमारे,पप्पू वाघमारे, सुभाष तांगडे, सतिष सिनगारे, राजाभाऊ वक्ते, शाम वीर , अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, देवानंद वाघमारे अशोक दळवी, भैय्यासाहेब साळवे, भाऊसाहेब दळवी, दिलीप खंदारे, सुभाष पारवे, रामदास मस्के, मनोज बोराडे, महेंद्र वडमारे, बाळासाहेब गव्हाणे, भाउसाहेब कांबळे, भास्कर जावळे, सोनू वडमारे, जितेंद्र खरात, मोहन वक्ते, यांच्यासह हजारो गायरान धारक, महीला, व रिपाइं कार्यकर्ते महाधरणे आंदोलनात सामील झाले होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुख्यमंत्री-कृषी मंत्री जागे व्हा! तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई द्या



## शेतकऱ्यांचा जीव धोक्यात - सरकार झोपेत, विद्यार्थी काँग्रेसची आक्रमक भूमिका

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातच नव्हे महाराष्ट्रात गेल्या पंधरा दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना न्याय द्यावा. सतत गेल्या पंधरा दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे या पावसाने शेतकरी अडचणीत सापडला आहे. पावसाने शेतात आजही पाणी साचून शेतातील पीक पूर्णपणे कुजत आहे. नदीकाठावरील शेती तर पूर्णपणे खरडून गेली आहेत. शेतकर्यांच्या तोंडचा घास निघून गेला आहे, शेतकर्यांनी जगावं कसं, असा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी विद्यार्थी काँग्रेस बीड यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून परतीच्या पावसाने हजेरी लागली आहे. या झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शेतकर्यांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. यामुळे शेती नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होत आहे. बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी सोयाबीन, कांदा, बाजरी, कपासी इतर तरकारी पिकांमध्ये पाणी साठल्याने ही पिके पाण्यात बुडालेली आहेत. त्यामुळे शेतकर्यांना लाखोंचा फटका बसला आहे. मुसळधार पावसामुळे भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यात अधिक भर म्हणजे बाजारपेठेमध्ये दर कोसळल्याने शेतकर्यांना पावसाचा व दरांचा असा दुहेरी फटका बसत आहे. सोयाबीन पिकामध्ये पाणी साठल्याने सोयाबीन खराब होऊन कीड लागून खराब झाली आहे. परतीच्या पावसाने खरीप हंगामा वर मोठे संकट ओढवले असून शेतकरी अक्षरशः कमरे एवढे पाण्यात आहेत ६५ मि.मी. पेक्षा अधिक पाऊस पडला म्हणजे ती अतिवृष्टी झाली. इथे एका दिवसात १९८ मि.मी. पावसाची नोंद बीड जिल्ह्यात झाली आहे. यावेळी विद्यार्थी काँग्रेस जिल्हाध्यक्ष शिवराज शिरसट पाटील ,जिल्हा उपाध्यक्ष अजिंक्य थोटे, युवक काँग्रेस तालुका उपाध्यक्ष निखिल भिसे व अन्य विद्यार्थी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## तुळजापूर ते बीड पायी ज्योत घेऊन येणाऱ्या युवकांचे जंगी स्वागत व अल्प उपहार वाटप कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बार्शी नाका बीड परिसरातील समाजसेवक भावी नगरसेवक सातीराम आण्णा ढोले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कानिफनाथ नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षी हि ईमामपूर रोड ढोले वस्ती येथील शेकडो युवक तुळजापूर येथून पाई ज्योत बीड या ठिकाणी मोठे उत्साहाने आनंदाने मनोभावे आई जगदंबाचे आशीर्वाद घेऊन पायी ज्योत घेऊन येत असतात यावर्षीही आकाश सुभाषराव ढोले, अशोक दादा ढोले पाटील, संभाजी ढोले, सुदर्शन ढोले, खंडोजी गलधर, खंडु ढोले, ऋषिकेश ढोले,अनिकेत ढोले, सचिन ढोले, अमोल गलधर,



विक्रम गलधर, अशोक सुरवसे ,अमोल सुरवसे, अमोल वाणी, बंडू सुरवसे भैया ढोले, अजय ढोले विजय ढोले, परमेश्वर ढोले, गौरव ढोले, अमोल ढोले, अशोक जाधव, हारेष गलधर,दिपक घायाळ, आप्पा जाधव, करण ढोले, महेश ढोले, सुनिल पवार,निलेश जाधव, अशोक घुमरे, राजाभाऊ ढोले, अतुल हुंबे ,अमोल नेवडे, संकेत शिंदे, संजय तुपे, सह आदी युवकांचे बार्शी नाका बीड येथे जंगी स्वागत केले व युवक तरुणांना अल्प उपहार वाटप करुन भव्य पाई ज्योत यात्रेत सहभागी होऊन आई राजा उदो उदो जगदंबेच्या जय घोषणेने परिसरात आंनदमय वातावरण निर्माण झाले होते व यावेळी सेवानिवृत्त पोलिस दत्ता मामा गलधर, बप्पा आण्णा ढोले, महादेव ढोले, दत्ता चव्हाण, मच्छिंद्र जोगंदड, सह परिसरातील प्रतिष्ठित नागरिक भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

## श्री. सांगुळे बंधू यांच्या नवीन उद्योगाचा भव्य शुभारंभ ह.भ.प. गुरुवर्य महंत योगीराज महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अंबिका चौक येथे श्री.सांगुळे बंधू यांच्या ज्योतिबा दुध डेअरी, बेकरी डेली नीड्स या नवीन उद्योगाचा शुभारंभ श्रीक्षेत्र रामगडचे महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या शुभारंभ प्रसंगी राष्ट्रवादीचे नेते श्री. अमर (नाना) नाईकवाडे, श्री सुहास (आबा) पाटील (नेते शिवसंग्राम)श्री. परमेश्वर (नाना) तळेकर (सरपंच केतुरा), श्री श्रीराम (अण्णा) सांगुळे(सरपंच तांदळवाडी ) श्री दिलीप (बप्पा) आहेर (माजी सरपंच उमरद (ज), प्रसिद्ध युवा विधीज्ञ श्री. शशिकांत सावंत साहेब,श्री. अण्णासाहेब धुताडमल सर (सरपंच दगडी शहाजनपुर), श्री. प्रकाश इंदुरे (माजी सरपंच दगडीशहाजनपूर), श्री.सुहास



रकटे (सरपंच आहेरचिंचोली) श्री.घोडके साहेब बीड तालुका व पंचक्रोशीतील दूध उत्पादक शेतकरी व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यानिमित्ताने बीड शहरातील अंबिका चौक येथे प्रथमच सुपा येथील नामांकित तुपातील खारी, बिस्किट व बेकरी प्रॉडक्ट्स होलसेल व योग्य दरात मिळणार आहेत. तालुक्यातील विविध गावातून येणारे ताजे दूध सकाळी व संध्याकाळी ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. तसेच ताज्या दुधापासून बनवलेले घरगुती गावरान तूप, पनीर, खवा, दही, श्रीखंड व आईस्क्रीम व कोल्ड्रिंक्स योग्य दरात मिळणार आहे. तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला चांगला भाव यानिमित्ताने मिळणार आहे तरी सर्व दूध उत्पादक शेतकरी ,ग्राहक व विक्रेते यांनी एकदा ज्योतिबा दुध डेअरीला अवश्य भेट देऊन कॉलिटी आणि चव याचा अनुभव घ्यावा असे आवाहन श्री. जिजाराम सांगुळे यांनी केले आहे.

## अतिवृष्टीमुळे अभुतपूर्व नुकसानीमुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीची मदत द्यावी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील खरीप २०२५ हंगामात सप्टेंबर महिन्यात सतत झालेल्या अभुतपूर्व अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले आहे सरासरीच्या ५० टक्के पेक्षा अधिक पाऊस झालेला आहे या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पिके पाण्यात बुडाली आहेत अनेक ठिकाणी जमिनी खरडून गेल्या आहेत आता तोंडाचा आलेला घास हिरावला गेला आहे काही ठिकाणी मानवी जीवित हानी जनावरांचा मृत्यू तसेच घराची पडझड झालेली आहे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे

अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने राज्य सरकारला मागणी करण्यात येते की सरसकट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये आर्थिक नुकसान भरपाई एक लाख रुपये मदत देण्यात यावी नाही झाली तर अखिल भारतीय छावा संघटना तीव्र आंदोलन करेल याची शासनाने नोंद घ्यावी . तरी आपण याचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसान भरपाई देऊन त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी.

## साताऱ्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी: महसूल व सामाजिक न्याय मंत्री यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सातारा येथील निवासस्थान राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाची अंमलबजावणी कार्यवाही विलंब न लावता तातडीने करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



व सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले. सामाजिक न्याय मंत्री यांच्या दालनात मंत्रालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सातारा येथील वास्तव्यास असतानाच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणे संदर्भात बैठक झाली. या बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे,

## सुर्यभान मोहिते यांचे दु:खद निधन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी हंबर्डे वस्ती येथील गहीनीनाथ मोहिते व नवनाथ मोहिते यांचे वडील अँड.महादेव मोहिते यांचे आजोबा सुर्यभान मोहिते वय- ९१ यांचे राहत्या घरी मंगळवार दि.२३ सप्टेंबर रोजी पहाटे वृध्दपकाळामुळे निधन झाले आहे.ते माजी पं.स.सदस्य,पत्रकार किरण पोकळे व आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे यांचे मामा होते. त्यांच्यावर आष्टी येथील हंबर्डेवस्ती शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यविधीस किशोर हंबर्डे, मोहन झांबरे, सरपंच सुधीर पठाडे, अँड. राकेश हंबर्डे, राहुल मुथा, संजय शिंगवी, अशोक तांबे, शिवाजी धस, प्रशांत होळकर, अँड. बापुसाहेब खिलारे, अजिनाथ काकडे, प्रीतम कासवा,बबन करांडे, जालिंदर वांढरे, अशोक परकाळे, सतिश पोकळे, पांडूरंग पोकळे, भोगाडे सर आदीसह आष्टी, पांढरी ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रशासनाच्या तत्पर मदतकार्यामुळे जिल्ह्यातील 227 पूरग्रस्तांची सुटका

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात २१ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे पाथर्डी, शेवगांव, जामखेड व अहिल्यानगर या तालुक्यांतील ओढे - नाले, नदीकाठावरील गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे अनेक गावांतील नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. स्थानिक प्रशासन, महसूल विभाग, महानगरपालिका अग्निशमन विभाग, तसेच नागरिकांच्या मदतीने २२७ व्यक्तींची सुरक्षित सुटका करण्यात आली आहे. जिल्ह्यातील २४ मंडळांमध्ये अतिवृष्टीची



नोंद झाली आहे. अहिल्यानगर (कापुरवाडी, केडगांव, भिंगार, चिचोंडी, चास), श्रीगोंदा (मांडवगण, कोळेगांव), कर्जत (मिरजगाव), जामखेड (जामखेड, खर्डा, नान्नज, नायगांव, साकत), शेवगांव (बोधेगांव, चापडगांव, मुंगी), पाथर्डी (पाथर्डी, माणिकदौडी, टाकळी, कोरडगांव, करंजी, तिसगांव, खरवंडी, अकोला) अशा मंडळांच्या गावांमध्ये ७० मिमी ते १५५ मिमीपर्यंत पावसाची नोंद झाली आहे.

बचावकार्याची ठळक माहिती– अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हास्तरीय शोध व बचाव पथक यांनी सारोळा बद्दी, जामखेड - पाथर्डी बायपासवर पाण्यात अडकलेल्या दोन बसेसमधील ७० जणांची सुटका केली. यामध्ये तीन महिन्याच्या बाळाचाही समावेश होता. पाथर्डी तालुक्यातील कारेगाव येथील ३ जण , पिंपळगव्हाण - १, खरमाटवाडी - २५, कोरडगाव - ४५ व कोळसांगवी - १२ व्यक्तींची महसूल प्रशासन व स्थानिक नागरिकांनी सुरक्षित सुटका केली.

जामखेड तालुक्यातील धनेगाव - ४ व्यक्ती, वंजारवाडी - ३०, शेवगांव तालुक्यातील खरडगांव - १२ व आखेगाव - २५ नागरिकांना पूरामधून वाचविण्यात आले.

## राज्यात स्वतंत्र एनसीसी अकॅडमी उभारणार - क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय छात्र सेने (एनसीसी) च्या प्रशिक्षणासाठी राज्यात लवकरच स्वतंत्र एनसीसी अकॅडमी उभारण्यात येणार आहे. या प्रशिक्षण संस्थेसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात जागा उपलब्ध करुन देण्यासाठीची कार्यवाही करण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले. मंत्रालयात 'एनसीसी' कार्यान्वयन संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी, उपसचिव सुनील पांढरे, तसेच भारतीय नौदल छात्र सेनेचे संचालक कॅप्टन जेनीश जॉर्ज आदी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान एनसीसी विद्यार्थ्यांनी बनविलेली भारतीय नौदल युद्धनौकेची प्रतिकृती अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. कोकाटे यांना भेट दिली.

## अंथरवन पिंपरी तांड्यात अतिवृष्टीचा कहर

- शेतपिकांचे, घरांचे व संसार उपयोगी साहित्याचे मोठे नुकसान
- प्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शासनाकडून मदत मिळवून द्यावी : दिनेशराव पवार

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील अंथरवन पिंपरी तांडा व उमरी, उमरद खालसा, नागापूर, अंथरवण पिंपरी, खांडे पारगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतपिकांचे नुकसान, घरांची पडझड तसेच संसार उपयोगी साहित्याची नासधूस झाली आहे. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी अंथरवन पिंपरी तांडा येथील सामाजिक कार्यकर्ते दिनेशराव पवार यांनी थेट शेतशिवारात जाऊन शेतकर्यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन प्रशासनाने शासनाकडून



तात्काळ मदत मिळवून द्यावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

अंथरवण पिंपरी तांडा परिसरातील शेतकरी बांधवांशी संवाद साधताना पवार म्हणाले की, शेतकर्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. घरांची पडझड व अन्नधान्य नष्ट झाल्याने जनतेवर मोठे संकट कोसळले आहे. या तांड्यावरील आश्रमशाळेत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत अनेक विद्यार्थी उमरी, उमरद खालसा, नागापूर, अंथरवण पिंपरी, खांडे पारगाव येथून शिक्षण घेण्यासाठी येतात, अतिवृष्टीमुळे या भागातील रस्ते वाहून गेल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सर्व शेतकर्यांना भरपाई मिळवून द्यावी. तसेच या तांड्यावर विमुक्त जाती व भटक्या जमातीचे ऊसतोड कामगार रहातात.

## जाहीर प्रगटन

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार – सौ. सविता भ्र. सुरेशराव खडके, रा. अंकुश नगर, जुना चऱ्हाटा रोड,, बीड, ता. जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून व अधिकृत केल्यावरुन मी सर्वांच्या माहिती करिता हे जाहीर प्रगटन देत आहे की, अशोक चांदमलजी लोढा, रा. पालवण, ता. जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील मौजे पालवण ता. जि. बीड येथील गट नं. ४१५ रेणुकाई नगर मधील प्लॉट क्र. ४२ ज्याची लांबी पुर्वपश्चिम १२.८० मीटर व रुंदी दक्षिणोत्तर १० मीटर आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२८ चौ.मी. आहे. ज्यास एन. ए. जा.क्र. २०२५/जमा/ तुकडे बंदी/ तु. नियमीत/ मौ. पालवण/ग.नं./स.नं. ४१५/प्र.क्र.१०४ दि. ११.०७.२०२५ अशी आहे. ज्याची चतु:सिमा पुर्वेस – ६ मीटर सरकारी रस्ता, पश्चिमेस – प्लॉट क्र. ३५, दक्षिणेस – प्लॉट क्र. ४३, उत्तरेस – प्लॉट क्र. ४१ अशी आहे.

उपरोक्त वर्णनाचा प्लॉट मालकाने माझे पक्षकार यांना असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट हा पुर्णपणे निर्विवाद, निंजोखीम, कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही अथवा प्रलंबीत नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉट संपादित झालेला नाही अथवा तशी नोटीस प्लॉट धारकास आलेली नाही. व सदर प्लॉट हा कोणत्याही स्थानिक संस्थेने रिजर्व्ह केलेला नाही तसेच प्लॉट / मिळकत मालकाने माझे पक्षकारास आणखी असा विश्वास दिला आहे की, त्यांनी माझे पक्षकारा शिवाय ईतरां सोबत सदर प्लॉटच्या संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. द्वारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. तसेच सदर प्लॉट त्यांचे शिवाय त्यांचे वालीवारस व इतरांच्या कोणताही हक्क संबंध नाही तरी माझे पक्षकार याद्वारे सर्वांना सूचित करतात की, वरील प्लॉट खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार, गहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन दिल्या पासून १० दिवसाचे आत संपूर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह लेखी स्वरुपात नोंदवावीत अन्यथा व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व मुदती नंतर कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत,
ॲड. राम ज. दहिवाळ
सुभाष कॉलनी, पेठ बीड पोलीस स्टेशन समोर, बीड, ता.जि. बीड
मो.नं. ९४०४१३०३७७

शिक्का

जाहीर प्रगटन देणार
सौ. सविता भ्र. सुरेशराव खडके
मो.नं. ९०२१८९३६७७

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७३८/२०२५

अंजना नारायण गाडे विरुद्ध निरंक

ज्याअर्थी मयत नामे नारायण लिंबाजी गाडे दिनांक १३.०९.२०२४ रोजी औरंगपुर कुकडा. पो. पाचेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार– १. अंजना नारायण गाडे, वय ५७ वर्षे धदा शेती, रा. औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड, २. वैजिनाथ नारायण गाडे, वय ३४ वर्षे धंदा शेती, रा. औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड, ३. संतोष नारायण गाडे, वय ३६ वर्षे धंदा शेती, रा. औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड, ४. शितल सुरेश काकडे, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. टाळगव्हाण, पो. रामपुरी, ता. गेवराई जि. बीड, ५. द्वारका सुदाम देवडकर, वय ४६ वर्षे धंदा शेती, रा. आडगांव ता. जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार याना सदर मयत नामे नारायण लिंबाजी गाडे औरंगपुर कुकडा, पो. पाचेगांव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख : १०.१०.२०२५
(मार्फत अँड. महाजन एच जी )

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय का स्तर गेवराई

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५ • पान ४



कुलस्वामिनी श्री. त्वरितादेवी तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड (छायाचित्र : ओमराजे कांबीलकर तलवाडा)

# नांदूर हवेलीतील पूरग्रस्त भागाची आपत्ती व्यवस्थापन विभाग मंत्री गिरीश महाजन यांनी केली पाहणी







बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने सिंदफणा नदीला पूर आला आहे. या नदीचे पाणी बऱ्याच भागांमध्ये घुसले असून, बीड तालूक्यातील नांदूर हवेली गावात देखील नदीचे पाणी घुसल्याने अनेक नागरिक पाण्याम ध्ये अडकले होते. त्या पार्श्वभूम ीवर जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन विभाग मंत्री गिरीश महाजन यांनी आज बीड तालूक्यातील नांदूर हवेली येथील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी श्री. महाजन यांनी नागरिकांशी संवाद साधुन, त्यांना तात्काळ मदत मिळण्यासाठी आश्वासित केले. पंचनामे करण्याचे काम सुरु आहे, परंतू शासनामार्फत पूर्वग्रस्त भागातील बाधीत नागरिक आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचविण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह नांदूर हवेली येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.



*पो ठा शिरूर कासार हद्दीतील ब्रम्हनाथ येळंब हद्दीतील वणवे वस्ती येथे अंदाजे ५० ते ६० नागरिक व ३०-४० शेळ्या पुरा मध्ये अडकल्याने संपर्क तुटला होता सर्व नागरिकांना बिट अंमलदार पोह तुषार गायकवाड व बिट मदतनीस सुनील बहिरवाल यांनी सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले आहे.*

## पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता शासकीय वाहनाने बीड जि. हिरापूरकडे प्रयाण. दुपारी ३.३० वाजता आगमन व मौजे हिरापूर जि. बीड येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी. सायंकाळी ४.०० वाजता शासकीय वाहनाने बीडकडे प्रयाण. सायंकाळी ४.४५ वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव. गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बीड ग्रामीण (जि.बीड), शिरूर कासार,आष्टी आणि पाथर्डी जि. अहिल्यानगर या तालुक्यात अतिवृष्टी झालेल्या नुकसाणीची पाहणी दौरा.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई व कर्जमाफी द्या

## • लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन : डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

मागील आठवडाभरापासून बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मुसळधार पाऊस, अतिवृष्टी व ढगफुटी झाली. जिल्ह्यातील तब्बल ७ लाख ८९ हजार ६७६ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची नोंद झाली असून ती सरासरी पेरणीच्या ९७.६ टक्के इतकी आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे.

बीड जिल्ह्यातील २९ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली असून, त्यापैकी लिंबागणेश महसूल मंडळात सर्वाधिक १०७.३ मि.मी. पाऊस झाला आहे. सततच्या पावसाम ुळे पिके वाहून गेली, शेतजमिनी तळाला गेल्या, घरांची पडझड झाली, तर कापूस, सोयाबीनसह इतर पिके पाण्यात बुडल्यानं शेतकरी पूर्णपणे हतबल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर



शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी आज मंगळवार दि. २३ रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर - अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी बाळासाहेब मुळे, कृष्णा पितळे, रमेश गायकवाड आदींची भाषणे झाली.तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना फोनवरून संवाद साधला, मंडळ ▶▶ उर्वरित पान २ वर

## स्वातंत्र्यानंतरही मूलभूत सुविधांपासून वंचित ; संतप्त नागरिकांनी तहसीलदाराला पाण्यात उतरवले

## आमदार साहेब, मूलभूत प्रश्नासाठी तरी तत्परता दाखवा : प्रकाश उजगरे

बीड । प्रतिनिधी

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ हून अधिक वर्षे उलटली, तरीही कोठारबन (ता. वडवणी) मधील आंबेडकर नगरकडे जाणारा व गावाला जोडणारा पूल झालेला नाही. अनेक वर्षांपासून ग्रामस्थ सातत्याने रस्ता व पुलाची मागणी करत आहेत, मात्र प्रशासनाकडून कायम दुर्लक्षच होत आले आहे. अतिवृष्टीमुळे गावाचा संपर्क तुटला अलीकडील अतिवृष्टीमुळे गावाचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. रुग्णांना वेळेत दवाखान्यात नेता येत नाही,विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित झाले,दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले,तहसीलदारांना थेट पाण्यात उतरवले या संतापातून गावकऱ्यांनी वाहत्या पाण्यात उतरून आंदोलन छेडले. परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या तहसीलदारांना ग्रामस्थांनी थेट पाण्यात उतरवून आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते प्रकाश उजगरे यांनी जाहीर पाठिंबा दिला.ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य करून रस्ता व पुलाचे काम सुरू झाले पाहिजे, अन्यथा आमचा संघर्ष अधिक तीव्र होईल, असा इशारा त्यांनी दिला. यावेळी उपस्थित कोठारबन गावातील सरपंच, तसेच गावातील शाळकरी मुले, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना तत्काळ मदत करा, ओला दुष्काळ जाहीर करा: मयंक गांधी

## शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट ; अंबाजोगाई उपविभागीय अधिकाऱ्यांनाही शेतकऱ्यांचे निवेदन

परळी वै. । प्रतिनिधी

परळी वैजनाथ, अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने नुकसान झालेच आहे. त्याबरोबरच संपूर्ण बीड जिल्हा आणि मराठवाड्यातही शेतकरी संपूर्णतः कोसळला आणि कोलमडला आहे. ऐन दसरा आणि दिवाळीचा सणासुदीचा काळ समोर असताना संकटाच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करावी तसेच म



राठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करावा ▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठवाड्याला नैसर्गिक आपत्ती घोषित करा : भाई अ‍ॅड. नवले यांची मागणी

बीड । प्रतिनिधी



मराठवाड्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, संपूर्ण भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूम ीवर शेतकरी कामगार पक्षाचे नेते अ‍ॅड. भाई राजेंद्र नवले यांनी बीड व धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा नैसर्गिक आपत्तीग्रस्त म्हणून जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच शेतकर्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत देण्याची मागणी ते जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्याकडे करणार असून मागणी मान्य न केल्यास २ ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी बीड यांचे कार्यालयाच्या दारात तीव्र निदर्शने करण्यात येईल असा इशारा भाई अ‍ॅड. नवले दिला आहे.

अ‍ॅड. नवले यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, शेतकर्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत देण्याची मागणी केली. या निवेदनात त्यांनी स्पष्ट केले आहे की, सध्याच्या पावसामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर


# तुळजापूर ते कपिलधारवाडी पायी ज्योत सोहळ्याचे जल्लोषात स्वागत

## कपिलधारवाडी ग्रामदैवत वाघेश्वरी माता मंदिरात विधिवत घटस्थापना

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी गावातील ग्रामस्थांनी त्यांच्या ग्रामदैवत वाघेश्वरी माता मंदिरात विधिवत घटस्थापना केली. याप्रसंगी गावकर्यांच्या उपस्थितीत धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले.

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त, या कार्यक्रमाचा प्रारंभ तुळजापूरहून पायी ज्योत आणण्याच्या परंपरेच्या सोहळ्याने झाला. मागील दहा वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही गावकर्यांच्या



भक्तिभाव आणि उत्साहाने साजरी झाली. ज्योत प्रवासादरम्यान, मार्गावर विविध गावकर्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि जयघोषात ज्योत दाखल होईपर्यंत सोहळ्याचा उत्साह वाढवत राहिला. वाघेश्वरी मित्र मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने संपूर्ण सोहळ्याचे आयोजन केले गेले. गावात काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून फुलांच्या उधळणीतून सोहळ्याला विशेष तेज आणले. कपिलधारवाडी येथील वाघेश्वरी माता मंदिरात ज्योत आगमनानंतर विधिवत पूजेसाठी नेण्यात आली. या प्रसंगी गावात धार्मिक आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. ▶▶ उर्वरित पान २ वर

# ना. पंकजाताई मुंडे यांनी पवारांकडून घेतली माहिती - शेतकऱ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी झालीय, विषय खूप गंभीर, तातडीने मदत करा : बाळराजे पवार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी खचल्या आहेत. त्याच बरोबर, नागरिकांच्या घरात पाणी गेल्याने अनेकांचे संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी बाळराजे पवार यांनी केली आहे. दरम्यान, युवा नेते बाळराजे पवार यांनी मंगळवार ता. २३ रोजी सिंदफणा काठच्या गावांना भेटू देऊन नुकसान झालेल्या भागाची पाहाणी केली. राज्याच्या पर्यावरण



मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्याशी व्हिडीओ कॉलवरून संवाद साधून, गेवराई मतदारसंघातल्या नुकसानीचे सविस्तर माहिती दिली. झालेल्या नुकसानी संदर्भात चर्चा करून, नुकसानग्रस्त भागाचा सविस्तर अहवाल द्या, अशी सूचना ना. मुंडे यांनी पवार यांना केली आहे. सदरील संभाषण युवा नेते बाळासाहेब सानप यांच्या मोबाईलवर झाले.गेवराई तालुक्यातील विविध भागाला, रविवार व सोमवारी पून्हा मुसळधार पावसाने अक्षरश झोडपून काढले आहे. शहराच्या पश्चिम, उत्तर, दक्षिण भागातील गाव रहदारीचे रस्ते पाण्यात गेले आहेत. त्यामुळे, जन जीवन विस्कळीत झाले आहे. शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका गोदावरी व ▶▶ उर्वरित पान २ वर

# गायरान धारकांच्या नावे जमिनी करण्यासाठी राज्यभर लढा उभा करणार: पप्पू कागदे

## गायरान धारकांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने आज दि.२३ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन भव्य रॅली काढून, जिल्हाधिकारी कार्यालयावर



महाधरणे आंदोलनास सुरुवात करण्यात आली.

केंद्रिय मंत्री रामदास आठवले दलित पँथरच्या माध्यमातून कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा केला. राज्याचे समाज कल्याण मंत्री असतांना १४ एप्रिल १९९० ला शासन परिपत्रक (शासन जी.आर.) लागू केला. त्यामुळे लाखो हेक्टर गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करुन त्यांना उपजीविका भागविण्याचे साधन निर्माण करुन दिले.गायरान जमिनी ▶▶ उर्वरित पान २ वर

**● राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपाइंचे शिष्टमंडळ येत्या १५ दिवसात राज्याचे मुख्यमंत्री व महसूलमंत्री यांना भेटणार आहे.**